ePaper

**करुणा मुंडे आणि धनंजय मुंडे यांच्यातील संबंध हे लग्नासारखेच : मुंबई सत्र न्यायालय**




| वर्ष - 8 | अंक - 257 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज™


### आतील पानांत


- गुजरात टायटन्सचा विजयी चौकार!
- प्रियांश काल रात्री ३ला झोपला
- आयात शुल्काचे परिणाम अद्याप अस्पष्ट!
- बांगलादेशची मालवाहतूक सवलत रद्द


www.mahaenews.com | गुरुवार, दि. 10 एप्रिल 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## पिंपरी-चिंचवडमध्ये विधानसभा मतदारसंघ वाढणार

# शहरात 5 विधानसभा मतदारसंघ होणार!

## उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार यांचा दावा

। मुंबई । प्रतिनिधी । महाईन्यूज

**एकेकाळी शांत असणाऱ्या बीड जिल्ह्यात गेल्या आठ-दहा वर्षात जी गुंडगिरी फोफावली, त्याला कारणीभूत एकमेव ज्येष्ठ नेते शरद पवार आहेत, असा आरोप जिल्ह्यातील सर्व ज्येष्ठ नागरिक करीत आहेत. गुंड कोणत्याही पक्षाचा असो, तो पवारांच्या मुशीतच तयार झाला आहे, आणि त्याला वरदहस्त हा शरद पवार यांचाच आहे, असे सगळेजणच ठामपणे सांगतात. सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांच्या आरोपांमुळे या मुद्द्याला पुष्टीच मिळाली आहे.**



पिंपरी-चिंचवड शहराची लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे. २०२९ ला मतदारसंघाची पुनर्रचना होण्याची शक्यता आहे. त्यामुळे सध्या तीन असलेल्या विधानसभा मतदारसंघात वाढ होईल. शहरात पाच विधानसभा मतदारसंघ होतील. चिंचवडचे दोन मतदारसंघ होतील, असा दावा उपमुख्यमंत्री, पालकमंत्री अजित पवार यांनी केला.

पिंपरीत बोलताना अजित पवार म्हणाले, भविष्यात पिंपरी चिंचवड शहरात पाण्याची कमतरता भासणार आहे. त्यामुळे ठोकरवाडी आणि मुळशीतील धरणातून पाणी शहरासाठी पाणी आणण्यात येणार आहे. वाहतुकीची कोंडी सोडवण्यासाठी पुणे मेट्रो निगडीवरुन वाकड आणि चाकण पर्यंत नेण्यात येणार आहे. रस्ते विकास महामंडळाच्या माध्यमातून वर्तुळाकार मार्ग (रिंगरोड)चे कामे सुरू आहे. पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या माध्यमातूनही रिंगरोडचे काम हाती घेतले जाणार आहे. ज्यांच्या जमिनी जातात, त्यांना मोबदला देण्यात येणार असल्याचे' सांगून पवार म्हणाले, 'राज्यात उष्णता वाढली आहे.

काही लोकांचा उष्म घातामुळे मृत्यू झाला आहे. राज्यातील धरणातील पाण्यात घट होत आहे. याकडे सरकारचे लक्ष आहे. सद्यस्थितीत धरणातील पाणी पावसाळ्यापर्यंत पुरेल यासाठी प्रयत्न केला जात आहे. शहरात उद्योग मोठ्या प्रमाणात आहेत. उद्योगाबाबत नवीन धोरण आणले जाणार आहे. शहरातील अनेक कारखाने बाहेर गेले आहेत. कोणत्या गोष्टीला परवानगी दिल्यानंतर रोजगार निर्माण होईल, याचा विचार करून धोरण तयार केले जात आहे. ते लवकरच जाहीर होईल', असेही त्यांनी सांगितले. दीनानाथ मंगेशकर रुग्णालयातील गर्भवती महिला मृत्यू प्रकरणात डॉ. घैसास यांनी राजीनामा दिला. कधीकधी आरोप झाल्यानंतरही राजीनामा द्यावा लागतो. चौकशी अहवाल आल्यानंतर मुख्यमंत्र्यांशी चर्चा करून रुग्णालयावरील कारवाईचा निर्णय घेण्यात येईल, असेही अजित पवार यांनी म्हटले आहे.

### विधानसभा उपाध्यक्षांना अजितदादांचा सल्ला

विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांची मुर्ती लहान, पण किर्ती महान आहे. आता सकाळी लवकर कामाला लागा, लोकांना वेळ द्या, विधानसभेला वेळ द्यावा लागेल. जेवढं महत्वाचे पद, तेवढे जास्त कष्ट घ्यावे लागतात. तुमच्या चिरंजीवाला जरा समजावून सांगा. घरातील व्यक्तीने चुकीचे कृत्य केल्यास स्वतःची, पक्षाची, सरकारची बदनामी होते, असा सल्ला उपमुख्यमंत्री अजित पवार पवार यांनी बनसोडे यांना दिला. विधानसभा उपाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल शहरातील महायुतीच्या वतीने अण्णा बनसोडे यांचा नागरी सन्मान करण्यात आला. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. महाविकास आघाडीचे सरकार असताना आमदार अण्णा बनसोडे यांच्या मुलावर गुन्हा दाखल झाला होता. करोनात जिल्हा बंदी असतानाही बनसोडे यांचा मुलगा पसार झाला होता. त्यावरून राष्ट्रवादी काँग्रेस, बनसोडे यांच्यावर मोठी टीका झाली होती. हाच धागा पकडून अजित पवार यांनी चिरंजीवाला जरा समजावून सांगा असा सल्ला बनसोडे यांना दिला.

## रुग्णाकडून अनामत रक्कम घेऊ नका

### शहरातील 650 खासगी रुग्णालयांना पिंपरी महापालिकेची नोटीस

। पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**दीनानाथ मंगेशकर रुग्णालयामध्ये गर्भवतीला अनामत रक्कम मागितल्याचे समोर आल्यानंतर आता पिंपरी-चिंचवड महापालिकेने शहरातील ६५० खासगी रुग्णालयांना नोटीस बजावली आहे. यापुढे कोणत्याच रुग्णालयाने रुग्णाकडून अनामत रकमेची मागणी करू नये, तसेच मागणी केल्यास परवाना रद्द करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे.**




शहरातील ६५० नोंदणीकृत रुग्णालयांना अनामत रक्कम न घेण्याबाबत परिपत्रक काढले आहे. रुग्णालयामध्ये येणाऱ्या अतितत्काळ आणि तत्काळ उपचारासाठी जे रुग्ण येतील त्यांच्यावर पहिल्यांदा तप्तरतेने उपचार करणे आवश्यक आहे. यामध्ये अनामत रक्कमही येते. महापालिकेकडून रुग्णालयांना बॉम्बे नर्सिंग ॲक्टनुसार परवाने देण्यात आले आहेत. त्यामुळे या कायद्यांतर्गत येणारी दंडात्मक कारवाईही केली जाणार आहे. यामध्ये रुग्णालयांना नोटीस देणे, नोटिशीमधून खुलासा मागणे आणि सक्त सूचना देणे, तसेच दंडात्मक कारवाईचाही समावेश आहे. पुन:पुन्हा त्याच चुका होत असतील, तर परवानाही रद्द करण्यात येणार आहे, असे महापालिकेचे आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे यांनी सांगितले.

# पुण्यात वर्षभरात 70 मातामृत्यू!

## महापालिकेच्या आरोग्य विभागाची आकडेवारी

। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुण्यात एप्रिल २०२४ ते मार्च २०२५ या कालावधीत ७० मातामृत्यू झाले आहेत. त्यात महापालिका क्षेत्रातील रहिवासी २६ माता असून, महापालिकेबाहेरील २५, इतर जिल्ह्यांतील १९ माता आहेत. विशेष म्हणजे, एकूण मातामृत्यूंपैकी ५२ मृत्यू हे दारिद्र्यरेषेच्या वर असलेल्या कुटुंबातील आहेत.**



महापालिकेच्या आरोग्य विभागाच्या आकडेवारीनुसार, एप्रिल २०२४ ते मार्च २०२५ या कालावधीत शहरात ७० मातामृत्यू झाले. त्यातील ५२ दारिद्र्यरेषेच्या वरील आणि १५ दारिद्र्यरेषेच्या खालील आणि ३ इतर होते. त्यामुळे सर्वाधिक मृत्यू हे दारिद्र्यरेषेवरील आहेत. मातामृत्यूंमध्ये अशिक्षित ५, आठवीपर्यंत शिक्षण झालेल्या १७ आणि आठवीपेक्षा जास्त शिक्षण झालेल्या ४५ होत्या. शिक्षणाचा तपशील माहिती नसलेल्या ३ माता आहेत. यात आठवीपेक्षा जास्त शिक्षण झालेल्या मातांची संख्या अधिक आहे. पुण्यात आधीच्या वर्षात एप्रिल २०२३ ते मार्च २०२४ मध्ये ७९ मातामृत्यू झाले होते. त्यात महापालिकेतील ३१, महापालिकेबाहेरील ३१, जिल्ह्यांबाहेरील १६ आणि इतर राज्यांतील १ होते. मातामृत्यूंमध्ये दारिद्र्य रेषेवरील ६५ आणि दारिद्र्य रेषेखालील १४ मृत्यू होते. एकूण मातामृत्यूंमध्ये अशिक्षित ९, आठवीपर्यंत शिकलेल्या १४ आणि आठवीपेक्षा जास्त शिकलेल्या ५४ आणि शिक्षणाचे तपशील नसलेल्या २ माता होत्या, असेही आरोग्य विभागाच्या आकडेवारीतून स्पष्ट झाले आहे.गेल्या वर्षभरात पुण्यात मृत्यू झालेल्या २२ प्रकरणांमध्ये कुटुंबीयांकडून महिलेला रुग्णालयात नेण्याचा निर्णय वेळेत घेतला गेला नसल्याचे निदर्शनास आले. याच वेळी रुग्णालयात पोहोचण्यास विलंबाचे केवळ एक प्रकरण आढळले. रुग्णालयात वेळेवर उपचार न झाल्याचे एकही प्रकरण आढळले नाही. याच वेळी ४२ प्रकरणांमध्ये तपशील उपलब्ध नव्हता, असेही आकडेवारीतून समोर आले आहे.मातामृत्यू झाल्यानंतर त्याची चौकशी महापालिकेच्या मातामृत्यू अन्वेषण समितीकडून केली जाते. त्यात प्रामुख्याने महिलेला कुटुंबीयांनी वेळेत रुग्णालयात नेण्याचा निर्णय घेतला का, तिला रुग्णालयात पोहोचविण्यास विलंब लागला का आणि रुग्णालयात महिलेवर वेळेवर उपचार झाले का, या तीन गोष्टींची समिती तपासणी करते. यातून मातेचा मृत्यू होण्याचे नेमके कारण समोर येण्यास मदत होते.

महापालिकेच्या आरोग्य विभागाच्या आकडेवारीनुसार, एप्रिल २०२४ ते मार्च २०२५ या कालावधीत शहरात ७० मातामृत्यू झाले. त्यातील ५२ दारिद्र्यरेषेच्या वरील आणि १५ दारिद्र्यरेषेच्या खालील आणि ३ इतर होते. त्यामुळे सर्वाधिक मृत्यू हे दारिद्र्यरेषेवरील आहेत. मातामृत्यूंमध्ये अशिक्षित ५, आठवीपर्यंत शिक्षण झालेल्या १७ आणि आठवीपेक्षा जास्त शिक्षण झालेल्या ४५ होत्या. शिक्षणाचा तपशील माहिती नसलेल्या ३ माता आहेत. यात आठवीपेक्षा जास्त शिक्षण झालेल्या मातांची संख्या अधिक आहे. पुण्यात आधीच्या वर्षात एप्रिल २०२३ ते मार्च २०२४ मध्ये ७९ मातामृत्यू झाले होते. त्यात महापालिकेतील ३१, महापालिकेबाहेरील ३१, जिल्ह्यांबाहेरील १६ आणि इतर राज्यांतील १ होते. मातामृत्यूंमध्ये दारिद्र्य रेषेवरील ६५ आणि दारिद्र्य रेषेखालील १४ मृत्यू होते. एकूण मातामृत्यूंमध्ये अशिक्षित ९, आठवीपर्यंत शिकलेल्या १४ आणि आठवीपेक्षा जास्त शिकलेल्या ५४ आणि शिक्षणाचे तपशील नसलेल्या २ माता होत्या, असेही आरोग्य विभागाच्या आकडेवारीतून स्पष्ट झाले आहे.

### 42 प्रकरणांमध्ये तपशील उपलब्ध नव्हता

गेल्या वर्षभरात पुण्यात मृत्यू झालेल्या २२ प्रकरणांमध्ये कुटुंबीयांकडून महिलेला रुग्णालयात नेण्याचा निर्णय वेळेत घेतला गेला नसल्याचे निदर्शनास आले. याच वेळी रुग्णालयात पोहोचण्यास विलंबाचे केवळ एक प्रकरण आढळले. रुग्णालयात वेळेवर उपचार न झाल्याचे एकही प्रकरण आढळले नाही. याच वेळी ४२ प्रकरणांमध्ये तपशील उपलब्ध नव्हता.

# अर्थसहाय्य योजनांसाठी 3 हजार विद्यार्थ्यांची निवड

## योजनेनुसार दोन ते 18 हजार रुपयांपर्यंतची रक्कम मिळणार

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या शिष्यवृत्ती योजनांचे स्वरूप बदलण्यात आले आहे. आता त्याला अर्थसाह्याचे स्वरूप देण्यात आले असून, एकूण सहा अर्थसाह्य योजनांसाठी पदवीपूर्व आणि पदव्युत्तर पदवी स्तरावरील एकूण ३ हजारांहून अधिक विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. या विद्यार्थ्यांना योजनेनुसार दोन ते १८ हजार रुपयांपर्यंतची रक्कम मिळणार आहे.**




विद्यापीठाच्या आवारातील शैक्षणिक विभागांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसह कार्यक्षेत्रात पुणे, अहिल्यानगर आणि नाशिक जिल्ह्यातील संलग्न महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांसाठी सहा योजना राबवण्यात येतात. त्यात छत्रपती शिवाजी महाराज अर्थसाह्य योजना, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले अर्थसाह्य योजना, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे अर्थसाह्य योजना, राजर्षी शाहू महाराज अर्थसाह्य योजना, महात्मा जोतिराव फुले अर्थसाह्य योजना, स्वामी विवेकानंद अर्थसाह्य योजना यांचा समावेश आहे.

या योजनांसाठी अर्थसंकल्पात तरतूद करण्यात येते. त्यानुसार शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठी पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांची यादी विद्यापीठाने प्रसिद्ध केली आहे. क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले अर्थसाह्य योजनेत प्रत्येकी पाच हजार रुपये दिले जाणार आहेत. त्यात पदवीपूर्व स्तरावरील ७८३ विद्यार्थ्यांची, तर पदव्युत्तर स्तरावरील २४४ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. लोकशाहीर अण्णा भाऊ साठे अर्थसाह्य योजनेतही प्रत्येकी ५ हजार रुपये दिले जाणार आहेत. त्यात पदवीपूर्व अभ्यासक्रमांचे २९२, पदव्युत्तर अभ्यासक्रमांचे २२५ विद्यार्थी पात्र ठरले आहेत. राजर्षी शाहू महाराज अर्थसाह्य योजनेत ६ हजार रुपये देण्यात येणार आहेत. त्यासाठी पदवीपूर्व स्तरावरील कला शाखेतील ९२, वाणिज्य शाखेतील २०७, विज्ञान शाखेतील २४९ विद्यार्थी प्राप्त ठरले आहेत.

### प्रत्येकी 16 हजार रुपये मिळणार

महात्मा जोतिराव फुले अर्थसाह्य योजनेत पदवी स्तरावर सहा हजार रुपये देण्यात येणार आहेत. त्यात कला शाखेतील ४०, वाणिज्य शाखेतील १९३, विज्ञान शाखेतील २१६ विद्यार्थी पात्र ठरले आहेत. पदव्युत्तर पदवी स्तरावर कला शाखेतील ५०, वाणिज्य शाखेतील ५१ विद्यार्थ्यांना प्रत्येकी ८ हजार रुपये दिले जाणार आहेत. तर विज्ञान शाखेतील १८७ विद्यार्थ्यांना प्रत्येकी १६ हजार रुपये मिळणार आहेत.

## 200 आयटी उद्योग ठप्प, 66 हजार ग्राहकांना फटका

# ‘आयटी सिटी’मध्ये बत्तीगुल!


### महापारेषणच्या अतिउच्च दाब उपकेंद्रात बिघाड

### हिंजवडीसह, पिंपळे सौदागर, सांगवी, रहाटणीमध्ये मध्यरात्री वीजपुरवठा खंडित

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महापारेषणच्या अतिउच्चदाब रहाटणी १३२ केव्ही उपकेंद्रात बिघाड झाल्यामुळे पिंपळे सौदागर, सांगवी गाव, रहाटणी परिसरात मंगळवारी मध्यरात्री ते बुधवारी पहाटे तीन तासांच्या कालावधीमध्ये चक्राकार पद्धतीने विजेचे अर्धा ते दीड तास भारनियमन करावे लागले. महापारेषांच्या उपकेंद्रात बिघाड झाल्यामुळे हिंजवडीमधील २०० आयटी उद्योगांसह हिंजवडी, वाकड परिसरातील घरगुती, व्यावसायिक व इतर सुमारे ६६ हजार ग्राहकांचा वीजपुरवठा ३७ मिनिटे बंद होता.**





महापारेषणच्या रहाटणी १३२/२२ केव्ही उपकेंद्रातील ५० एमव्हीए क्षमतेच्या करंट ट्रान्सफॉर्मरमधून मंगळवारी मध्यरात्री धूर निघाला. अभियंत्यांनी पाहणी केल्यानंतर हा ट्रान्सफॉर्मर तातडीने बदलणे आवश्यक असल्याचे निदर्शनास आले व त्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली. मात्र यासाठी महावितरणच्या २२ केव्ही वीजवाहिन्यांचा वीजपुरवठा बंद करण्यात आल्याने २२ मेगावॅट विजेची तूट निर्माण झाली. ही तूट पर्यायी व्यवस्थेतून भरून काढण्याचे प्रयत्न करण्यात आले. मात्र रात्रीच्या उकाड्यामुळे विजेची मागणी वाढल्याने भारव्यवस्थापन शक्य झाले नाही. परिणामी पिंपळे सौदागर, सांगवी, रहाटणी, काळेवाडी, विशालनगर, कस्पटेवस्ती या परिसरात मंगळवारी रात्री बारा ते बुधवारी पहाटे पावणेतीन वाजेपर्यंत अर्धा ते दीड तासांपर्यंत चक्राकार भारनियमन करावे लागले.

### 200 आयटी उद्योग ठप्प

बुधवारी दुपारी साडेबारा वाजता महापारेषणच्या कांदळगाव २२० केव्ही अतिउच्चदाब टॉवर लाइनमध्ये ट्रिपिंग आले. त्यामुळे महावितरणच्या ३३ केव्ही क्षमतेच्या १३ वीजवाहिन्यांचा वीजपुरवठा बंद पडला. परिणामी हिंजवडीमधील २०० आयटी उद्योगांसह हिंजवडी, वाकड परिसरातील घरगुती, व्यावसायिक व इतर सुमारे ६६ हजार २०० ग्राहकांचा वीजपुरवठा ३७ मिनिटे बंद होता. त्यानंतर दुपारी वीजपुरवठा सुरळीत झाला.


---

## कुदळवाडीतील लघु उद्योजकांच्या पुनर्वसनाची मागणी

### भोसरीतील प्रस्तावित इमारतीत गाळ्यांची निर्मिती, आ. महेश लांडगे यांची पालिका प्रशासनाला सूचना

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।


**कुदळवाडीमध्ये महापालिका प्रशासनाने सरसटक अतिक्रमण कारवाई केली. या कारवाईमध्ये अवैध भंगार दुकाने हटवण्यात आली. त्यात काही लघु उद्योजकांचेही नुकसान झाले आहे. त्यामुळे भोसरी एम.आय.डी.सी. आरक्षण क्रमांक 40 प्लॉट क्र. टी. 201 येथे लघु उद्योजकांचे पुनर्वसन करावे पुनर्वसन करावे, अशी मागणी भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांनी केली आहे.**




याबाबत महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांना निवेदन दिले आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका प्रशासनाच्या माध्यमातून भोसरी एम.आय. डी.सी. आरक्षण क्रमांक 40 प्लॉट क्र. टी. 201 येथे लघु उद्योजकांचे पुनर्वसन करण्यासाठी इमारत उभारण्याचे काम प्रस्तावित आहे. सदर कामाला दि. 16 जून 2008 रोजी कार्यादेश देण्यात आला आहे. मात्र, काम अद्याप अपूर्ण आहे. सदर प्रकल्पामध्ये दोन इमारती असून, 208 औद्योगिक गाळे नियोजित आहे. गाळ्यांचे क्षेत्रफळ 292 ते 630 चौ. फुटापर्यंत इतके आहे. वरील मजल्यावर वाहतुकीसाठी रॅम्प, फायरफायटिंग सिस्टम व लँडस्केपिंग अशा सुविधा देण्यात येणार आहे. मेटेरिअल व पॅसेंजर लिफ्टचीही सुविधा राहणार आहेत. महापालिकेच्या धोरणानुसार, या प्रकल्पातील गाळ्यांचे वितरण पुनर्वसनास पात्र गाळे धारकांना करण्यात येणार आहे. उर्वरित गाळे लिलाव पद्धतीने वितरीत करण्याचे प्रस्तावित आहे. या इमातीमध्ये 208 गाळे निर्माण करण्यात येणार आहेत. त्यामुळे प्रस्तावित इमारतीचे काम तातडीने पूर्ण करण्यासाठी आमदार लांडगे यांनी पाठपुरावा सुरू केला आहे.

> “ पिंपरी-चिंचवड महानगरपालिका प्रशासनाने कुदळवाडी येथे सरसकट अतिक्रमण कारवाई केली. त्यामुळे भूमिपुत्र आणि लघुउद्योजकांचेही नुकसान झाले. या लघु उद्योजकांचे पुनर्वसन करण्याबाबत प्रशासनाने सदर प्रकल्पाचा सहानुभूतीपूर्वक विचार करावा. यासाठी भोसरी एमआयडीसी येथे उभारण्यात येणाऱ्या इमारतीचे काम तातडीने मार्गी लावावे आणि त्या ठिकाणी निर्माण होणाऱ्या 208 गाळ्यांमध्ये कुदळवाडीतील लघु उद्योजकांना प्राधान्य द्यावे. त्या अनुशंगाने सकारात्मक कार्यवाही करावी, अशी मागणी महापालिका प्रशासनाला केली आहे. तसा पाठपुरावा करीत आहोत.
>
> **–महेश लांडगे,**
> आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने »



### संत हे भगवंताची आठवण देण्याचे कार्य करीत असतात.

ज्याला सत्याचे ज्ञान झाले तो सर्वज्ञच बनला; आणि जे या सत्याला धरून राहतात ते संत होत. संत आपल्याला मार्ग दाखवायला तयार असतात, परंतु आपला अभिमान आड येतो, आणि आपण संतांना नावे ठेवतो. एकजण संतांना उद्देशून म्हणाला, "तुम्ही आमचे नुकसान करता; अपकार करणाऱ्यावरही उपकार करायला सांगून आम्हांला मेषपात्र करता." वास्तविक, आपल्या संतांनी कर्मांचा ढीग पाडला आहे, पण त्यांच्या आणि आपल्या कर्मांमध्ये फरक आहे. 'राम कर्ता' या भावनेने त्यांनी कर्म केले; आपण 'मी'पणाने करतो, म्हणून कर्म आपल्याला बंधनकारक बनते. संतांची कामगिरी कुणाला दिसत नाही; आणि आमची फक्त दिसण्यापुरतीच असते, त्यामुळे ती पुरी पडत नाही ! एखादा पुष्कळ ज्ञानी झाला, पण ते ज्ञान जर वृत्तीत उतरले नाही तर त्याचा काय उपयोग? जगाचे खरे स्वरूप समजून घेण्यासाठी जो सुखदु:खाच्या जाळ्यात सापडला नाही त्याच्याकडे जावे. तो साक्षित्वाने राहून जगापासून अलिप्तच राहतो. कर्म करूनही तो अलिप्त राहतो. आपण मात्र सुखदु:खात गुरफटून जातो. संताचे अंत:करण शुद्ध असल्यामुळे त्याची शिव्यांची भाषासुद्धा न बोचणारी, किंबहुना आशीर्वादरूपच ठरते. सत्पुरुष काही विद्वान् नसतात. अती विद्वान् मनुष्य कोणी सत्पुरुष झालेला ऐकिवात नाही. कुणी आठव्या वर्षीच घरातून निघून जातो, तर कुणी लग्नातून पळून जातो, तर कुणाला लिहायला-वाचायलाही येत नाही, असे लोक सत्पुरुष झालेले आढळतात. संतांनी देह सोडल्यावर सुद्धा लोकांना त्यांचे अस्तित्व भासते. लहान मूल बाहेर खेळत असते, परंतु मध्येच त्याला आईची आठवण होऊन तिच्याकडे धावते. याचा अर्थ असा की, मुलाला आईचे सूक्ष्म स्मरण सतत असते. तसा भगवंताचा चटका, तशी त्याच्या अस्तित्वाची जाणीव, तशी त्याची निष्ठा, आपल्याजवळ पाहिजे. भगवंताची अशी तळमळ लागली की मनुष्य वेडा बनतो. त्या स्थितीत त्याला कुणी संत भेटला की तो निवांत होतो. संत हे खरोखर आईसारखे आहेत. ते आपल्याला भगवंताची आठवण देण्याचे कार्य करीत असतात. सर्व जगावर संतांचे उपकार आहेत. त्यांनी परमात्म्याला सगुणात आणले आणि तो आपल्याला सुसेव्य केला; परमात्म्याला आपलासा करून घ्यायला नामस्मरण हे सोपे साधन दिले; एकनाथी भागवत, ज्ञानेश्वरी असे सोपे सद्ग्रंथ निर्माण केले; आणि यथाशक्ती अन्नदान करणे हेच कलियुगात उत्तम साधन आहे असे सांगितले. या चार गोष्टी आचरणात आणायचा प्रयत्न ज्याने केला, त्याला काही कमी पडणार नाही; नेहमी समाधानच राहील.

बोधवचन:- जग संतांशिवाय असणे शक्य नाही; आम्हांला त्यांना ओळखता येत नाही.



'स्टेट'मेंट

अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

# डोनाल्ड ट्रम्प यांच्या डोक्यात काय? अमेरिकेच्या नादी लागायचं नाय !



**गेली सुमारे शंभर वर्षे संपूर्ण जगाने अमेरिकेला महासत्ता मानले आहे. या काळात त्यांना जो जो देश नडला किंवा आव्हान दिले अथवा विरोध केला, त्या देशाला उद्ध्वस्त करण्याचे कुभांड नेहमीच अमेरिकेने रचले. अनेक देशांना त्यांनी अक्षरशः देशोधडीला लावले. 'अमेरिकेचा नाद करायचा नाय' असा अलिखित इशाराच जणू त्यांनी संपूर्ण जगाला दिलेला आहे.**

### नडाल तर उद्ध्वस्त व्हाल !

जो जो देश अमेरिकेला नडला, त्या देशाला उद्ध्वस्त करून अमेरिकेने नेहमीच सूड उगवला आहे. पूर्वी जपानने त्यांना आव्हान दिल्यावर त्यांनी त्यांचा नाश केला होता हे अवघ्या जगाला माहीत आहे. जेव्हा संयुक्त रशियाने त्यांना आव्हान दिले, तेव्हा त्यांनी त्यांचे सतरा तुकडे केले होते, हा इतिहास सुद्धा अगदी ताजा आहे.

### इराक तर किस झाड की पत्ती..

अमेरिकेच्या विरोधात इराकने डोके वर काढले तेव्हा त्यांनी त्यांचा नाश केला. इराक चे अध्यक्ष सद्दाम हुसेन यांना पकडून त्यांना फाशी देण्यापर्यंत मजल मारली गेली. अशा देशांची आधी आर्थिक नाकेबंदी करून त्यांना जेरीस आणण्याचा अमेरिकेचा नेहमीच प्रयत्न असतो.

### आता अमेरिकेचे 'टार्गेट' चीन..

आता, अमेरिकेचे प्रमुख 'टार्गेट' हे चीन आहे. पण, भारताला अधिक भौगोलिक राजकीय महत्त्व प्राप्त झाल्याने अमेरिकेची वाईट नजर कधी सुद्धा भारताकडे वळण्याची शक्यता नाकारता येत नाही. भारताने नेहमीच अशा कपटी मित्रा पासून सावध राहायला हवे! गेल्या १०० वर्षांपासून अमेरिकन उद्योगपतींनी जगातील पहिल्या दहा उद्योगपतींवर वर्चस्व गाजवले आहे. पहिल्या दहा पैकी आठ- नऊ फक्त अमेरिकन उद्योगपती आहेत, हीच खऱ्या अर्थाने त्यांची अर्थनीती आहे.

### दुसऱ्या देशांच्या उद्योगपतींविरुद्ध लॉबिंग..

चीनचा प्रसिद्ध उद्योगपती जॅक मा याने तिसरा क्रमांक पटकावल्यावर त्याच्याविरुद्ध 'लॉबिंग' सुरू झाले आणि त्यांना पळून जावे लागले, ते आता गौतम अदानी आणि मुकेश अंबानींसारख्या भारतीय उद्योगपतींच्या मागे लागले आहेत, याबाबत जागरूक राहायला हवे. अमेरिकेची ताकद हा त्यांचा माज आहे, ते तंत्रज्ञान आणि व्यवसायाच्या बळावर संपूर्ण जगावर नियंत्रण ठेवण्याचा नेहमीच प्रयत्न करतात.

### अमेरिकेला आव्हान मान्य नसते..

कोणताही देश किंवा उद्योगपती त्यांच्याशी स्पर्धा करेल किंवा त्यांना आव्हान देईल, तर कोट्यवधी रुपये खर्च करून त्यांचा सर्वनाश करतील, ही त्यांची खऱ्या अर्थाने रणनीती म्हणावी लागेल. गेल्या पाच वर्षात भारतीय उद्योगपती अदानी उंच भरारी घेत होता, गेल्या वर्षी तो जगातील दुसरा सर्वात मोठा उद्योगपती बनला होता. हाच वेग कायम राहिला असता तर २०२४ मध्ये तो जगातील सर्वात मोठा उद्योगपती बनला असता, जगाने भारताकडे पाहिले असते, हा दृष्टिकोन लक्षात घ्या!

### तेल आयातीचे मोठे संकट..

एका महत्त्वाच्या विषयाकडे वळू. भारताचे तेल आयात बिल वाढल्याने १९९१ चे संकट देखील आले. अदानी भारताचा सर्वात महत्वाकांक्षी प्रकल्प, जगातील सर्वात कमी किमतीचा ग्रीन हायड्रोजन प्रकल्प उभारून भारताची ऊर्जा सुरक्षित करण्यासाठी काम करत आहे, जो कालांतराने तेल आणि वायूची जागा घेईल. हे हिंडनबर्गने अदानींवर वारंवार केलेल्या हल्ल्यांचे स्पष्टीकरण आहे आणि सीएनबीसी ने नुकत्याच वर्तवलेल्या अंदाजानुसार, अदानी जगातील दुसरे ट्रिलियनियर बनले आहे, या ग्रुपवर हल्ले फक्त इथूनच तीव्र होतील, हा मुद्दा झटकन लक्षात येण्यासारखा आहे.

### भारत स्वावलंबी झाला तर..

जर भारत 'आत्मनिर्भर भारत' आणि 'मेक इन इंडिया' मोहिमा चालवत असेल, तर याचा अर्थ भारत ही एक खूप मोठी बाजारपेठ आहे. जगातील वीस टक्के लोकसंख्येसह, इतर कोणत्याही अर्थव्यवस्थेपेक्षा वेगाने वाढत आहे. येत्या वीस वर्षात भारत स्वावलंबी झाला, तर अमेरिका, युरोप, चीन तसेच अरब जगताला मोठे नुकसान सहन करावे लागेल. एक डॉलरच्या तुलनेत भारतीय रुपया मजबूत होत राहील, असे त्या मागील आडाखे आहेत. भारतातही लॉबिंग सुरू झाले आहे, प्रत्येक देशात "पप्पस" ची कमतरता नाही. मीडिया विकत घेता येऊ शकतो.

### भारतात देशद्रोहींची कमतरता नाही..

अफगाणिस्तानात रशियाविरुद्ध तालिबानसारख्या संघटना उभारण्यासाठी अमेरिकेने अब्जावधी, ट्रिलियन डॉलर्स खर्च केले होते, त्यामुळे रशियाला काढता पाय घ्यावा लागला होता. अमेरिकेच्या दृष्टीने भारताला अस्थिर करणे त्याहूनही सोपे आहे, इथे देशद्रोहींची कमतरता नाही, इथल्या काही नेत्यांची विधाने बघा, ते उघडपणे परदेशी एजंट सारखे काम करत आहेत..न्यायाधीश विकले जातात..मीडिया विकला जातो. नेते विक्रीसाठी आहेत, अशी ही देशद्रोही वक्तव्ये काय कामाची?

### भारताची मोठी बाजारपेठ खुपते..

भारत ही खूप मोठी बाजारपेठ आहे, भारताने स्वावलंबी व्हावे, असे कोणत्याही देशाला वाटत नाही, त्यामुळे अशा गोष्टी सांगणाऱ्या सरकारांना पराभूत करण्यासाठी मोठी ताकद लावली जात आहे. परकीय शक्तींना भारतात 'मिश्र' सरकार हवे आहे, जे पडण्याची नेहमीच भीती असते. जर भ्रष्ट सरकार असेल तर आपण आपल्या गरजेनुसार धोरणे, नियम आणि कायदे बनवू शकतो, आवश्यक अटींवर भारतात व्यवसाय करणे सोपे होईल, असे इतर देशांना वाटत असावे.

### पंख छाटण्याचा उद्योग..

गेल्या दहा वर्षांपासून भारतात स्थिर आणि मजबूत सरकार आहे भारत सरकार आपल्याच उद्योगपतींना मजबूत बनवत आहे, याचा त्यांना त्रास आहे. त्यांची विचारसरणी अशी आहे की त्यांचे पंख छाटले पाहिजेत, कोणत्याही देशाचे बलस्थान हे तेथील 'उद्योगपती' आहे जे आपल्या देशातील कौशल्ये आणि वस्तूंचे परदेशात मार्केटिंग करतात,त्यांचे हित जपण्याचे काम सरकारचे आहे.

### देशद्रोह्यांचा उद्योगपतीविरुद्ध शंख

भारतीय उद्योगपती सध्या संपूर्ण जगात अव्वल ठरत आहेत, हे अमेरिकेला मुळीच मान्य नाही. अशा उद्योगपतींना पाठिंबा देणे हे भारताचे कर्तव्य आहे, पण, आता आम्ही अंबानी यांच्या विरोधात शंख करणाऱ्यांना देशद्रोही म्हणायचे नाही तर काय ? तेच खऱ्या अर्थाने अमेरिकेचे एजंट आहेत, असे दुर्दैवाने म्हणण्याची वेळ आली आहे!

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# मनसेला टार्गेट मागे 'महाशक्ती'!

## राष्ट्रवादीच्या नेत्या रोहिणी खडसे यांचे सूचक ट्वीट

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची मान्यता रद्द करण्यात यावी, यासाठी सर्वोच्च न्यायालयात एक याचिका दाखल करण्यात आली आहे. ही याचिका मुंबईतील उत्तर भारतीय विकास सेना पक्षाच्या सुनील शुक्ला यांनी दाखल केली आहे. या याचिकेच मनसेची मान्यता रद्द करण्यात यावी, यासाठी सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक आयोगाला आणि राज्य सरकारला आदेश द्यावेत, असं म्हटलं आहे. यावरून मनसेचे नेते आक्रमक झाले असून यावर राजकीय प्रतिक्रिया उमटत आहेत.**





दरम्यान, राज ठाकरे यांच्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्याबाबत याचिका दाखल करण्यात आल्याच्या मुद्यांवरून राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाच्या नेत्या रोहिणी खडसे यांनी एक सूचक ट्वीट केलं आहे. 'मनसेला टार्गेट करणाऱ्यांच्या मागे 'महाशक्ती' तर नाही ना?' अशी शंका रोहिणी खडसे यांनी व्यक्त केली आहे. त्यांच्या या ट्वीटनंतर राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आलं आहे.कालपासून मनसेची मान्यता रद्द करण्याची मागणी केली जात आहे. पक्षाला विविध इशारे दिले जात आहेत, त्यांच्या पदाधिकाऱ्यांना टार्गेट केले जात आहे. बंधू राज साहेब, मराठी पक्षांचे, मराठी उद्योजकांचे, मराठी भाषेचे किंबहुना महाराष्ट्र आणि मराठी माणसांचे काही पक्षांना वावडं आहे. कारण याआधीही मराठी माणसांनी बनवलेले दोन मराठी पक्ष फोडण्यात आले आहेत. तुम्ही एकदा तपासून घ्यावे मनसेला टार्गेट करणाऱ्यांच्या मागे कदाचित 'महाशक्ती' तर नाही?", असं रोहिणी खडसे यांनी म्हटलं आहे.महाराष्ट्रात मराठी भाषेची सक्ती व्हावी आणि व्यवहारात ही भाषा वापरली जावी, यासाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने आंदोलन सुरू केलं होतं. तसेच राज्यातील बँकांमध्ये मराठी भाषा वापरली जाते की नाही हे तपासण्याचे आदेश मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी महाराष्ट्र सैनिकांना (पक्ष कार्यकर्त्यांना) दिले होते. त्यानुसार, मनसेच्या कार्यकर्त्यांनी महाराष्ट्रातील वेगवेगळ्या बँकांमध्ये जाऊन मराठी भाषेचा आग्रह धरला. काही वेळा हिंसक आंदोलन केलं. मनसे कार्यकर्त्यांनी मराठीला विरोध करणाऱ्या काही कर्मचाऱ्यांच्या कानशीलात लगावल्या. मनसेच्या या आंदोलनानंतर उत्तर भारतीय विकास सेनेने राज ठाकरे यांच्याविरोधात सर्वोच्च न्यायालयाचं दार ठोठावलं आहे.मुंबईतील उत्तर भारतीय विकास सेनेचे सुनील शुक्ला यांनी राज ठाकरे यांच्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेविरोधात सर्वोच न्यायालयात याचिका दाखल केली. राज ठाकरे यांच्याविरोधात गुन्हा दाखल करून त्यांच्या पक्षाची मान्यता रद्द करावी, अशी मागणी या याचिकेद्वारे त्यांनी केली आहे. "राज ठाकरे हे उत्तर भारतीय लोकांविरोधातील हिंसेला पाठिंबा देत आहेत. त्यामुळे त्यांच्याविरोधात गुन्हा दाखल करावा, तसेच त्यांच्या पक्षाची मान्यता देखील रद्द करावी", असं शुक्ला यांनी त्यांच्या याचिकेत म्हटलं आहे.दरम्यान, राज ठाकरे यांच्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्याबाबत याचिका दाखल करण्यात आल्याच्या मुद्यांवरून राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाच्या नेत्या रोहिणी खडसे यांनी एक सूचक ट्वीट केलं आहे. 'मनसेला टार्गेट करणाऱ्यांच्या मागे 'महाशक्ती' तर नाही ना?' अशी शंका रोहिणी खडसे यांनी व्यक्त केली आहे. त्यांच्या या ट्वीटनंतर राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आलं आहे.कालपासून मनसेची मान्यता रद्द करण्याची मागणी केली जात आहे. पक्षाला विविध इशारे दिले जात आहेत.

### मराठी भाषेची सक्ती व्हावी

बंधू राज साहेब, मराठी पक्षांचे, मराठी उद्योजकांचे, मराठी भाषेचे किंबहुना महाराष्ट्र आणि मराठी माणसांचे काही पक्षांना वावडं आहे. कारण याआधीही मराठी माणसांनी बनवलेले दोन मराठी पक्ष फोडण्यात आले आहेत. तुम्ही एकदा तपासून घ्यावे मनसेला टार्गेट करणाऱ्यांच्या मागे कदाचित 'महाशक्ती' तर नाही?", असं रोहिणी खडसे यांनी म्हटलं आहे.महाराष्ट्रात मराठी भाषेची सक्ती व्हावी आणि व्यवहारात ही भाषा वापरली जावी, यासाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने आंदोलन सुरू केलं होतं. तसेच राज्यातील बँकांमध्ये मराठी भाषा वापरली जाते की नाही हे तपासण्याचे आदेश मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी महाराष्ट्र सैनिकांना (पक्ष कार्यकर्त्यांना) दिले होते.

# विडंबनात्मक गाणं करण्यासाठी पैसे दिले

## संजय निरुपम यांनी कामरा आणि ठाकरे यांच्यावर केले आरोप

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**स्टॅण्डअप कॉमेडियन कुणाल कामराने काही दिवसांपूर्वी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर विडंबनात्मक गाणं करून ते शोमध्ये सादर केलं होतं. मात्र, विडंबनात्मक गाणं सादर केल्याप्रकरणी शिवसेना (शिंदे) पक्षाचे कार्यकर्ते चांगेलच आक्रमक झाले होते. तसेस काही कार्यकर्त्यांनी कुणाल कामराच्या स्टुडिओची तोडफोड केली होती. या संपूर्ण प्रकरणावरून राज्यात नव्या वादाला तोंड फुटलं होतं. दरम्यान, नंतर या प्रकरणात कुणाल कामराच्या विरोधात गुन्हा देखील दाखल झाला.**






त्यानंतर मुंबई पोलिसांनी कुणाल कामराला चौकशीसाठी तीन समन्स बजवले. मात्र, कुणाल कामरा अद्याप चौकशीसाठी हजर झाला आहे. कुणाल कामराने न्यायालयात धाव घेतली असून न्यायालयाने कुणाल कामराला तात्पुराता दिलासा दिलेला आहे. मात्र, कुणाल कामराने विडंबनात्मक गाणं सादर केल्याप्रकरणावरून अद्यापही राजकीय वर्तुळात आरोप-प्रत्यारोप सुरु आहेत. आता शिवसेना (शिंदे) पक्षाचे नेते संजय निरुपम यांनी कुणाल कामरा आणि उद्धव ठाकरे यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत.
उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर विडंबनात्मक गाणं करण्यासाठी ठाकरे गटाने कुणाल कामराला पैसे दिले असल्याचा गंभीर आरोप संजय निरुपम यांनी केला आहे."शिवसेना ठाकरे गटासाठी ही निंदनीय बाब आहे. त्यांच्याकडे (उद्धव ठाकरे) आता कार्यकर्ते राहिले नाहीत. त्यांचे विचार देखील संपले आहेत. त्यामुळे ते एका कॉमेडियनचा सहारा घेऊन राजकारण करत आहेत.
मी या प्रकरणाच्या सुरवातीलाच सांगितलं होतं की कुणाल कामराने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याबाबत अशा प्रकारे आपत्तीजनक विधान केलं. पण कुणाल कामरा जे बोलला ते तो बोलत नसून ठाकरे गटाचे लोक बोलत आहेत", असा आरोप संजय निरुपम यांनी केला."ठाकरे गटाच्या लोकांनी त्याला (कुणाल कामराला) पैसे दिले होते. ठाकरे गटाच्या सांगण्यावरून ते विडंबनात्मक गाणं बनवण्यात आलं. तसेच संजय राऊत, उद्धव ठाकरे, आदित्य ठाकरे हे कुणाल कामराच्या समर्थनार्थ उभे आहेत. त्यावरून हे दिसून येतं की त्यांच्याकडे दुसरा काही मुद्दा, विषय राहिला नाही. या संपूर्ण प्रकरणात 'मातोश्री'चा सहभाग आहे. एवढंच नाही तर 'मातोश्री'ने यासाठी फंडीग केलं आहे. आता कुणाल कामरा कायद्याच्या चौकटीत अडकला आहे.

### ठाकरे गटासाठी ही निंदनीय बाब

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर विडंबनात्मक गाणं करण्यासाठी ठाकरे गटाने कुणाल कामराला पैसे दिले असल्याचा गंभीर आरोप संजय निरुपम यांनी केला आहे."शिवसेना ठाकरे गटासाठी ही निंदनीय बाब आहे. त्यांच्याकडे (उद्धव ठाकरे) आता कार्यकर्ते राहिले नाहीत.

# आयात शुल्काचे परिणाम अद्याप अस्पष्ट!

## एस जयशंकर यांचा सावध पवित्रा, भारतअमेरिका करारासाठी प्रयत्न

। ओडिशा ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर लादलेल्या परस्पर आयात शुल्काचे परिणाम अद्याप ज्ञात नसल्याचे परराष्ट्रमंत्री एस जयशंकर यांनी बुधवारी सांगितले. ही परिस्थिती हाताळण्यासाठी या वर्षाच्या अखेरपर्यंत अमेरिकेबरोबर व्यापार करार करणे ही भारताची रणनीती असल्याचे त्यांनी सांगितले. अमेरिकेने भारतावर २ एप्रिलपासून २६ टक्के परस्पर आयातशुल्क लादले आहे.**



### रचनात्मक पद्धतीने चर्चा करत आहोत

अमेरिकेने लागू केलेल्या आयात शुल्काच्या मुद्द्यावर जयशंकर यांनी प्रथमच तपशीलवार प्रतिक्रिया दिली. एका खासगी वाहिनीने आयोजित केलेल्या कार्यक्रमामध्ये बोलताना ते म्हणाले की, ट्रम्प दुसऱ्यांदा अध्यक्ष झाल्यानंतर त्यांच्याबरोबर व्यापार करारावर सहमती होणारा भारत हा बहुधा पहिलाच देश आहे. आयात शुल्काच्या मुद्द्यावर अमेरिकेबरोबर थेट संघर्ष करण्याऐवजी भारताने सावधगिरीची भूमिका घेतली आहे. आपण द्विपक्षीय व्यापार "या विविध मुद्द्यांवर चर्चा करण्याचा निर्णय आम्ही घेतला आहे आणि आम्ही त्याबद्दल काहीही लपवलेले नाही. आम्ही अतिशय रचनात्मक पद्धतीने चर्चा करत आहोत.

अमेरिकेने लागू केलेल्या आयात शुल्काच्या मुद्द्यावर जयशंकर यांनी प्रथमच तपशीलवार प्रतिक्रिया दिली. एका खासगी वाहिनीने आयोजित केलेल्या कार्यक्रमामध्ये बोलताना ते म्हणाले की, ट्रम्प दुसऱ्यांदा अध्यक्ष झाल्यानंतर त्यांच्याबरोबर व्यापार करारावर सहमती होणारा भारत हा बहुधा पहिलाच देश आहे. आयात शुल्काच्या मुद्द्यावर अमेरिकेबरोबर थेट संघर्ष करण्याऐवजी भारताने सावधगिरीची भूमिका घेतली आहे. आपण द्विपक्षीय व्यापार करार करण्यासाठी ट्रम्प प्रशासनाबरोबर वाटाघाटी करत असल्याचे केंद्र सरकारकडून सांगितले जात आहे. "या विविध मुद्द्यांवर चर्चा करण्याचा निर्णय आम्ही घेतला आहे आणि आम्ही त्याबद्दल काहीही लपवलेले नाही. आम्ही अतिशय रचनात्मक पद्धतीने चर्चा करत आहोत आणि आम्ही या वर्षाच्या हिवाळ्यापर्यंत द्विपक्षी करार करण्यासाठी वाटाघाटी करण्याचा प्रयत्न करू यावर आमची सहमती आहे," असे जयशंकर यांनी या कार्यक्रमात सांगितले.लंडन : भारतामध्ये परदेशी बँकांना मोठ्या वाढीची संधी असल्याचे केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी ब्रिटनमधील गुंतवणूकदारांशी बोलताना सांगितले. त्यांनी मंगळवारी संध्याकाळी लंडनमध्ये भारत-ब्रिटन गुंतवणूकदार गोलमेज बैठकीचे अध्यक्षस्थान भूषविताना वित्तीय क्षेत्रातील गुंतवणूकदारांबरोबर चर्चा केली. त्यासाठी विविध पेन्शन फंड, विमा कंपन्या, बँका आणि इतर वित्तीय कंपन्या यांच्या जवळपास ६० प्रतिनिधींनी सहभाग घेतला. शाश्वत आर्थिक विकास आणि गुंतवणुकीच्या संधींना सरकार प्राधान्य देत असल्याचे या बैठकीत सांगण्यात आले.अमेरिकेने लागू केलेल्या आयात शुल्काच्या मुद्द्यावर जयशंकर यांनी प्रथमच तपशीलवार प्रतिक्रिया दिली. एका खासगी वाहिनीने आयोजित केलेल्या कार्यक्रमामध्ये बोलताना ते म्हणाले की, ट्रम्प दुसऱ्यांदा अध्यक्ष झाल्यानंतर त्यांच्याबरोबर व्यापार करारावर सहमती होणारा भारत हा बहुधा पहिलाच देश आहे. आयात शुल्काच्या मुद्द्यावर अमेरिकेबरोबर थेट संघर्ष करण्याऐवजी भारताने सावधगिरीची भूमिका घेतली आहे. आपण द्विपक्षीय व्यापार करार करण्यासाठी ट्रम्प प्रशासनाबरोबर वाटाघाटी करत असल्याचे केंद्र सरकारकडून सांगितले जात आहे. "या विविध मुद्द्यांवर चर्चा करण्याचा निर्णय आम्ही घेतला आहे आणि आम्ही त्याबद्दल काहीही लपवलेले नाही. आम्ही अतिशय रचनात्मक पद्धतीने चर्चा करत आहोत आणि आम्ही या वर्षाच्या हिवाळ्यापर्यंत द्विपक्षी करार करण्यासाठी वाटाघाटी करण्याचा प्रयत्न करू यावर आमची सहमती आहे," असे जयशंकर यांनी या कार्यक्रमात सांगितले.लंडन : भारतामध्ये परदेशी बँकांना मोठ्या वाढीची संधी असल्याचे केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी ब्रिटनमधील गुंतवणूकदारांशी बोलताना सांगितले.त्यासाठी विविध पेन्शन फंड, विमा कंपन्या, बँका आणि इतर वित्तीय कंपन्या यांच्या जवळपास ६० प्रतिनिधींनी सहभाग घेतला.गुंतवणुकीच्या संधींना सरकार प्राधान्य देत असल्याचे या बैठकीत सांगण्यात आले.

# बांगलादेशची मालवाहतूक सवलत रद्द

## बांगलादेशला दिलेली मालवाहतूक सुविधा रद्द करण्याचा निर्णय

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**बांगलादेशच्या हंगामी सरकारचे मुख्य सल्लागार प्रा. मोहम्मद युनुस यांनी चीनची अर्थव्यवस्था ईशान्य भारतापर्यंत विस्तारावी या भूमिकेचा पुरस्कार केल्यानंतर, केंद्र सरकारने बुधवारी बांगलादेशला दिलेली मालवाहतूक सुविधा रद्द करण्याचा निर्णय घेतला. केंद्रीय अप्रत्यक्ष कर आणि सीमाशुल्क मंडळाने (सीबीआयसी) मंगळवारी याबाबत अधिसूचना जारी केली.**



### भारतीय निर्यातदारांची मागणी

भारताने बांगलादेशमधील वाढत्या कट्टरतावादाबद्दल चिंता व्यक्त केली होती अशी माहिती परराष्ट्रमंत्री एस जयशंकर यांनी नवी दिल्लीमधील एका कार्यक्रमात दिली. बांगलादेशात नव्याने निवडणुका व्हाव्यात अशी आग्रही भूमिका भारताने मांडल्याचे त्यांनी सांगितले.

या कालावधीत चीनच्या दौऱ्यावर होते. त्यावेळी त्यांनी भारताच्या सुरक्षेच्या दृष्टीने अतिशय मोक्याच्या असलेल्या ईशान्य भारतापर्यंत चीनच्या अर्थव्यवस्थेचा विस्तार व्हावा असे विधान केले होते. तसेच ईशान्य भारताला समुद्रकिनारा अजिबात नसल्याने या सर्व भागातील समुद्राचे बांगलादेश एकमेव पालक असल्याचा दावाही त्यांनी केला होता. या भागात चीन बांधकाम, उत्पादन, व्यापार, आयात आणि निर्यात करू शकतो असे भारताच्या दृष्टीने चिंताजनक विधान युनुस यांनी केले होते.भारताने २९ जून २०२०पासून दिलेल्या सुविधेअंतर्गत भूमी सीमाशुल्क स्थानकांमधून, भारताची बंदरे आणि विमानतळांवरून बांगलादेशला तिसऱ्या देशाला कंटेनर किंवा बंद ट्रकमधून मालवाहतूक करण्याची मुभा देण्यात आली होती. त्यासाठी भारताकडून कोणतेही शुल्क आकारले जात नव्हते. आता ही सुविधा काढून घेण्याच्या भारताच्या निर्णयामुळे बांगलादेशच्या भूतान, नेपाळ आणि म्यानमारबरोबरच्या व्यापारावर परिणाम होऊ शकतो. मात्र, या सुविधेचा वापर करून आधीच भारतात आलेल्या मालाची वाहतूक पूर्ण केली जाईल असे 'सीबीआयसी'ने स्पष्ट केले आहे.

वस्त्रोद्योग क्षेत्रातील भारतीय निर्यातदारांनी यापूर्वी बांगलादेशची सुविधा काढून घेण्याची मागणी केली होती. या निर्यातदारांची बांगलादेशची थेट स्पर्धा आहे. या निर्णयामुळे देशातील वस्त्रोद्योग, पादत्राणे, आणि मौल्यवान रत्ने व दागिने यासारख्या क्षेत्रातील अनेक भारतीय निर्यातदारांना फायदा होईल असे व्यापार तज्ज्ञांचे म्हणणे आहे. दिल्लीमध्ये बांगलादेशी माल भरलेले दररोज २० ते ३० ट्रक येतात, त्यामुळे आमच्या मालवाहतुकीवर परिणाम होतो असे कापड उद्योजकांची संघटना असलेल्या 'एईपीसी'चे अध्यक्ष सुधीर सेखरी यांनी सांगितले. व्यक्तविद्यार्थी आंदोलनानंतर तत्कालीन पंतप्रधान शेख हसीना या सत्तेतून पायउतार झाल्यानंतर भारत-बांगलादेश संबंधांमध्ये तणाव निर्माण झाला असून तो विविध कारणांमुळे दिवसेंदिवस वाढत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मोहम्मद युनुस यांची गेल्या आठवड्यात बैठक झाली.

# 'जाट'तील 22 दृश्यांमध्ये बदल करण्याची सूचना

बॉलिवूड अभिनेता सनी देओल (SUNNY DEOL) सध्या त्याच्या आगामी 'जाट' चित्रपटामुळे चर्चेत आहे. हा चित्रपट १० एप्रिल रोजी थिएटरमध्ये दाखल होणार आहे. एकीकडे, सलमान खानचा 'सिकंदर' बॉक्स ऑफिसवर चढ-उतारात कमाई करत आहे. दुसरीकडे, 'जाट'ची ॲडव्हान्स बुकिंग सुरू झाली आहे. अशातच प्रदर्शनाच्या एक दिवस आधी निर्मात्यांना मोठा धक्का बसला आहे. हा धक्का म्हणजे 'जाट'मधील काही दृश्यांना कात्री लागणार आहे. सेन्सॉर बोर्डाने 'जाट' चित्रपटातील २२ सीन काढून टाकण्यास सांगितलं आहे. तसंच काही शब्दही काढून टाकण्यास सांगितलं आहे. सेन्सॉर बोर्डाने सुचवलेले २२ बदल केल्यानंतर 'जाट'ला U/A १६+ प्रमाणपत्र दिले आहे. 'जाट' चित्रपटातील १० हृदयद्रावक दृश्ये बदलण्याचे आदेश सीबीएफसीने दिले आहेत. यामध्ये दोन गळा चिरण्याचे दृश्य, अंगठा कापण्याचे दृश्य, बर्फाच्या तुकड्यावर शिरच्छेद आणि रक्ताने माखलेले डोके, चर्चमध्ये येशू ख्रिस्ताचा पुतळा, एका मुलाचा विनयभंग, जमावाच्या पायाखाली भारतीय चलनी नोटा अशा काही दृश्यांचा समावेश आहे.काही दृश्यांबरोबरच 'जाट'मधील काही शब्दांनादेखील कात्री लावण्यात आली आहे. एका दृश्यात 'भारत' हा शब्द 'हमारा' या शब्दाने बदलण्यात आला आहे. 'मदरजात' हा शब्द बदलला आहे. 'सेंट्रल' शब्दाऐवजी 'लोकल' शब्द बदलण्यात आलं आहे. तसंच अनेक दृश्यांमधील अपशब्द काढून टाकण्यात आले आहेत आणि त्याऐवजी 'निकम्मा' आणि 'बेशरम' असे काही शब्द वापरले आहेत.

# प्रसिद्ध बॉलीवूड गायकाने गुपचूप उरकलं लग्न

नवीन वर्षाच्या सुरुवातीला प्रसिद्ध बॉलीवूड गायक अरमान मलिक विवाहबंधनात अडकला आहे. अरमानने त्याच्या इन्स्टाग्राम अकाउंटवर फोटो शेअर करून ही आनंदाची बातमी चाहत्यांना दिली. अरमानने त्याची गर्लफ्रेंड आशना श्रॉफशी लग्न केलं आहे. मागील बऱ्याच वर्षांपासून अरमान व आशना रिलेशनशिपमध्ये होते. अखेर दोघांनी लग्नगाठ बांधली असून आयुष्यातील नवीन प्रवासाला सुरुवात केली आहे. 'मैं रहूँ या ना रहूँ', 'जेहर', 'बोल दो ना जरा', 'पहेला प्यार', 'मुझको बरसात बना लो' अशा अनेक लोकप्रिय गाण्यांचा गायक अरमान मलिकने आयुष्यातील नवीन इनिंग सुरू केली आहे. अरमानने त्याची गर्लफ्रेंड आता पती-पत्नी झाले आहेत. अरमानने इन्स्टाग्रामवर लग्नातील फोटो पोस्ट केले आहेत. 'तू है मेरा घर' असं कॅप्शन अरमानने या फोटोंना दिलं आहे.अरमान मलिकने पत्नी आशनाला टॅग करत लग्नाचे ६ फोटो शेअर केले आहेत, ज्यामध्ये ते दोघेही लग्नाचे विधी पूर्ण करताना दिसत आहेत. अरमान व आशना यांच्या लग्नातील लूकची खूप चर्चा होत आहे. आशना केशरी रंगाच्या लेहेंग्यात खूप सुंदर दिसत आहे, तर अरमानने फिकट गुलाबी रंगाची शेरवानी घातली आहे, दोघेही एकत्र खूप क्यूट दिसत आहेत.

# अफेअरच्या चर्चांबद्दल त्रास

बॉलीवूड अभिनेता आमिर खान (AAMIR KHAN) त्याच्या वैयक्तिक आयुष्यामुळे अनेक कारणाने चर्चेत राहत असतो. अशातच नुकतंच त्याने त्याच्या ६० व्या वाढदिवसानिमित्त नवीन नात्याची घोषणा केली. २५ वर्षांपासूनची मैत्रीण असलेल्या गौरीबरोबर रिलेशनमध्ये असल्याचं आमिरने सांगितलं. गौरीबरोबर आमिरचे हे तिसरे रिलेशनशिप असून याआधी त्याची दोन लग्न झाली आहेत. त्याने पहिलं लग्न रीना दत्ताशी केलं होतं. या दोघांना आयरा आणि जुनैद ही मुलं आहेत. लग्नाच्या १५ वर्षांनंतर त्यांनी घटस्फोट घेतला. त्यानंतर आमिरने किरण रावशी दुसरं लग्न केलं. किरण रावसोबतही आमिरचा संसार १५ वर्षे टिकला. यादरम्यान, आमिरचे नावं इतरही काही अभिनेत्रींबरोबर जोडली गेली होती. किरण रावला घटस्फोट दिल्यानंतर आमिर आणि 'दंगल' फेम अभिनेत्री फातिमा सना शेख (FATIMA SANA SHAIKH) यांच्या अफेअरच्या चर्चा रंगल्या होत्या. किंबहुना फातिमामुळेच आमिरने किरणला घटस्फोट दिल्याचं म्हटलं गेलं होतं. याबद्दल आता स्वत: फातिमाने भाष्य केलं आहे. नुकत्याच एका मुलाखतीत अभिनेत्रीने या अफेअरच्या चर्चांबद्दल सांगितलं.फिल्मफेअरशी संवाद साधताना फातिमाला आमिर खानबरोबरच्या अफेअरच्या चर्चांबद्दल विचारण्यात आले. यावेळी अभिनेत्रीने उत्तर देत म्हणाले की, "मला याचा त्रास व्हायचा कारण यापूर्वी अशा गोष्टींचा कधी सामना केलेला नाही. काही अनोळखी लोक आहेत, ज्यांना मी कधीही भेटलेही नाही, ते माझ्याबद्दल काहीतरी लिहीत आहेत. त्या लोकांना यात काही तथ्य आहे .



# 'मी टू' प्रकरणात झालेले आरोप

दिग्दर्शक साजिद खान २०१८ मध्ये 'हाउसफुल ४'चे शूटिंग करताना त्याच्यावर अनेक महिलांनी #METOO मोहिमेंतर्गत लैंगिक शोषणाचे आरोप केले होते. या आरोपांमुळे त्याचे जीवन पूर्णतः बदलून गेले. तब्बल सहा वर्षे त्याने याबाबत मौन बाळगले. अलीकडेच त्याने एका मुलाखतीत या संदर्भात वक्तव्य केले आहे. साजिद खानने 'हिंदुस्तान टाइम्स'ला दिलेल्या मुलाखतीत गेल्या सहा वर्षांच्या काळाबद्दल सांगितले. साजिद म्हणाला, "या सहा वर्षांत अनेक वेळा स्वतःला संपवण्याचे विचार माझ्या मनात आले. भारतीय चित्रपट आणि दूरचित्रवाणी दिग्दर्शक संघटनेनं (IFTDA) परवानगी दिल्यानंतरही मला काम मिळालं नाही. या काळात कमाई नसल्यानं मला माझं घर विकावं लागलं आणि भाड्याच्या फ्लॅटमध्ये राहावं लागलं."साजिद म्हणाला, "करिअरच्या सुरुवातीच्या काळात, मी केवळ चर्चेत राहण्यासाठी खळबळजनक गोष्टी बोलत असे. जेव्हा मी टीव्हीवर काम करीत होतो, तेव्हा माझं काम लोकांचं मनोरंजन करणं होतं. पण, माझ्या काही वक्तव्यांनी मी अनेक लोकांना नाराज केलं. आज मी माझ्या काही जुन्या मुलाखती पाहतो, तेव्हा मला वाटतं की मी टाईम मशीन घेऊन जाऊन स्वतःला थांबवावं आणि सांगावं, 'अरे मूर्खा, तू काय बोलतो आहेस?. जेव्हा माझ्या वक्तव्यांनी लोकांची मनं दुखावली जात आहेत याची मला जाणीव झाली, तेव्हा मी त्यांची माफी मागितली."साजिद पुढे म्हणाला, "जेव्हा तुमच्याकडे काम नसतं, तेव्हा तुम्ही तुमच्या जीवनाबद्दल विचार करू लागता. आता मी शांत झालो आहे. आता मी केवळ कामावर लक्ष केंद्रित करू इच्छितो."

# कंगनाला आलं एक लाख वीज बिल

बॉलीवूड अभिनेत्री आणि हिमाचल प्रदेशच्या मंडीची खासदार कंगना रणौतने कायमच कोणत्या ना कोणत्या कारणाने चर्चेत राहत असते. ती अनेकदा राजकीय व मनोरंजन क्षेत्राशी संबंधित विषयांवर भाष्य करत असते. अशातच कंगणा एका विशेष कारणाने चर्चेत आली आहे आणि हे कारण म्हणजे तिला आलेलं विजेचं बिल. वीज बिलाचा मोठा झटका लागला आहे. याविरोधात तिने काँग्रेसच्या नेतृत्वाखालील हिमाचल प्रदेश सरकारवर जोरदार हल्लाबोल केला आहे. हिमाचल प्रदेशमधील मंडी इथं नुकत्याच झालेल्या एका राजकीय कार्यक्रमादरम्यान कंगना यांनी काँग्रेसवर जोरदार टीका केली. यावेळी तिने तिच्या मनालीमधील घराचं वीज बिल एक लाख रुपये आल्याचं सांगितलं आहे. कंगनाचं मुंबईशिवाय मनालीमध्येही एक घर आहे आणि तिच्या याचं घराचं वीज बिल लाख रुपये झाल्याने कंगणाला मोठा धक्का धक्का बसला आहे. विशेष म्हणजे या घरात कंगना क्वचितच राहत असल्याचे तिने स्वत: सांगितलं आहे.मंगळवारी मंडीमधील बल्ह विधानसभा क्षेत्रातील लोकांना संबोधित करताना कंगना म्हणाली की, "या महिन्यात माझ्या मनालीतील घराचं विजेचं बिल १ लाख रुपये आलं. या घरात मी राहतही नाही. इतकी दुर्दशा केलेली आहे. शरम वाटते की हे काय होत आहे. हिमाचल प्रदेशची अवस्था पाहणे वेदनादायक आहे."यापुढे तिने म्हटलं आहे की, "आपल्याकडे एक संधी आहे. तुम्ही सर्वजण जे मला माझ्या भावाबहिणींसारखे आहेत, तुम्ही ग्राउंड लेव्हलला इतकं काम करता. आपलं दायित्व आहे की, आपल्याला या देशाला, या प्रदेशाला प्रगतीच्या मार्गावर घेऊन जायचंय. मी तर म्हणेन की, हे सर्वजण लांडगे आहेत आणि आपल्याला त्यांच्या तावडीतून बाहेर पडायचं आहे." तिच्या या विधानाची सध्या सर्वत्र चर्चा होत आहे.कंगणा मनोरंजन क्षेत्रासह राजकीय क्षेत्रातही बरीच सक्रीय असते. २०२४ मध्ये तिने राजकारणात प्रवेश केला. हिमाचल प्रदेशातील मंडी या मतदारसंघातून निवडणूक लढवली होती आणि तिथे तिचा विजय झाला होता. कंगणाने भाजपकडून ही निवडणूक लढवली होती. तर अभिनेत्रीचा नुकताच 'इमर्जन्सी' चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला आला होता. यात तिने इंदिरा गांधी यांची भूमिका साकारली होती.दरम्यान, कंगणाच्या 'इमर्जन्सी' चित्रपटाला प्रेक्षकांकडून संमिश्र प्रतिसाद मिळाला होता. यानंतर आता ती अभिनेता आर. माधवनबरोबरच्या आगामी चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. त्यामुळे तिच्या या चित्रपटाची सर्वांना उत्सुकता लागून राहिली आहे.



# गुजरात टायटन्सचा विजयी चौकार!

## सुपर जायंट्सचे गोलंदाज ठरले मॅचविनर, रहाणेची खेळी व्यर्थ

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**शानदार फॉर्मात असलेल्या गुजरात टायटन्स संघाने राजस्थान रॉयल्सचा आपल्या घरच्या मैदानावर ५८ धावांनी मोठा पराभव केला आहे. या विजयासह गुजरात टायटन्ने सलग चौथा सामना जिंकला आहे. या विजयासह गुजरातचा संघ आयपीएलल २०२५ च्या गुणतालिकेत पहिल्या स्थानी पोहोचला आहे. गुजरातच्या संघाने अष्टपैलू कामगिरी करत मोठ्या धावसंख्येचा पाया रचला आणि नंतर झटपट विकेट घेत राजस्थानला पराभवाचं पाणी पाजलं.**



गुजरात टायटन्सने उत्कृष्ट गोलंदाजी करत राजस्थान रॉयल्सच्या फलंदाजांना मोठी भागीदारी रचण्यापासून दूर ठेवले आणि ठराविक अंतराने विकेट घेतले. याचे श्रेय गोलंदाजांबरोबर संघाचे कोच आशिष नेहरा यांना देखील जाते. गुजरातने प्रथम फलंदाजी करताना २१७ धावांचा डोंगर उभारला. तर प्रत्युत्तरात राजस्थान संघाला २०० धावांचा टप्पाही गाठू दिला नाही. राजस्थानचा संघ १५९ धावांवर सर्वबाद झाला.गुजरातने दिलेल्या २१८ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी उतरलेल्या राजस्थानची सुरूवात खराब झाली. संघाने पॉवरप्लेमध्ये २ विकेट्स गमावले. यशस्वी जैस्वाल आणि नितीश राणा स्वस्तात झेलबाद झाले. संजू सॅमसन आणि रियान पराग संघाचा डाव सावरला. पण संघाला विजयाच्या दिशेने नेऊ शकले नाहीत. संजू सॅमसन ४१ धावा तर रियान पराग २६ धावा करत बाद झाले. राजस्थानने विशिष्ट फरकाने सातत्याने आपल्या विकेट्स गमावल्या आहेत.शिमरॉन हेटमायरची बॅट या सामन्यात तळपली. हेटमायर ३२ चेंडूत ४ चौकार आणि ३ षटकारांसह ५२ धावा करत बाद झाला. तर इतर सर्व फलंदाज एकेरी धावांवर झेलबाद झाले. गुजरातने या सामन्यात चतुराईने गोलंदाजी करत राजस्थानच्या फलंदाजांना मोठ्या खेळी खेळण्याची संधी दिली नाही. प्रसिध कृष्णाने उत्कृष्ट गोलंदाजी करत ३ विकेट्स घेतल्या आहेत. तर राशिद खान आणि साई किशोर यांना २ विकेट्स मिळाले. याशिवाय सर्व गोलंदाजांनी १-१ विकेट्स मिळाले.राजस्थान रॉयल्स संघाने नाणेफेक जिंकत गुजरातला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केले होते. गुजरातची सुरूवातही शुबमन गिलच्या विकेटमुळे डगमगली. पण साई सुदर्शनने एका टोकाकडून धुव्वाधार खेळी केली. तर त्याला संघातील इतर फलंदाजांनी चांगली साथ दिली. साईने ५३ चेंडूत ८ चौकार आणि ३ षटकारांसह ८२ धावा केल्या. जोस बटलर आणि शाहरूख खानने प्रत्येकी उत्कृष्ट ३६ धावांची खेळी केली. तर राहुल तेवतियाने २४ धावांची तर राशिद खानने झटपट १२ धावांची खेळी केली आणि संघाला ६ बाद २१७ धावांपर्यंत नेले.गुजरात टायटन्सने उत्कृष्ट गोलंदाजी करत राजस्थान रॉयल्सच्या फलंदाजांना मोठी भागीदारी रचण्यापासून दूर ठेवले आणि ठराविक अंतराने विकेट घेतले. याचे श्रेय गोलंदाजांबरोबर संघाचे कोच आशिष नेहरा यांना देखील जाते. गुजरातने प्रथम फलंदाजी करताना २१७ धावांचा डोंगर उभारला. तर प्रत्युत्तरात राजस्थान संघाला २०० धावांचा टप्पाही गाठू दिला नाही. राजस्थानचा संघ १५९ धावांवर सर्वबाद झाला.गुजरातने दिलेल्या २१८ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी उतरलेल्या राजस्थानची सुरूवात खराब झाली.

### पराग 26 धावा करत बाद

संघाने पॉवरप्लेमध्ये २ विकेट्स गमावले. यशस्वी जैस्वाल आणि नितीश राणा स्वस्तात झेलबाद झाले. संजू सॅमसन आणि रियान पराग संघाचा डाव सावरला. पण संघाला विजयाच्या दिशेने नेऊ शकले नाहीत. संजू सॅमसन ४१ धावा तर रियान पराग २६ धावा करत बाद झाले. राजस्थानने विशिष्ट फरकाने सातत्याने आपल्या विकेट्स गमावल्या आहेत.शिमरॉन हेटमायरची बॅट या सामन्यात तळपली. हेटमायर ३२ चेंडूत ४ चौकार आणि ३ षटकारांसह ५२ धावा करत बाद झाला. तर इतर सर्व फलंदाज एकेरी धावांवर झेलबाद झाले. गुजरातने या सामन्यात चतुराईने गोलंदाजी करत राजस्थानच्या फलंदाजांना मोठ्या खेळी खेळण्याची संधी दिली नाही. प्रसिध कृष्णाने उत्कृष्ट गोलंदाजी करत ३ विकेट्स घेतल्या आहेत. तर राशिद खान आणि साई किशोर यांना २ विकेट्स मिळाले. याशिवाय सर्व गोलंदाजांनी १-१ विकेट्स मिळाले.

# शतकी खेळीनंतर प्रियांश काल रात्री ३ ला झोपला

## आर्यनेने चेन्नईविरुद्ध सामन्यातील खेळीने वेधून घेतले लक्ष

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**आयपीएल २०२५ मध्ये पंजाब किंग्सचा युवा फलंदाज प्रियांश आर्यने सर्वात जलद शतक झळकावले आहे. चेन्नई सुपर किंग्सविरूद्धच्या सामन्यात त्याने ३९ चेंडूत आयपीएलच्या इतिहासातील तिसरे सर्वात जलद शतक झळकावले. यानंतर दिल्लीचा असलेल्या प्रियांशच्या नावाची सर्वत्र चर्चा होत आहे आणि त्याचे बालपणीचे प्रशिक्षक संजय भारद्वाज यांनी आता एक धक्कादायक खुलासा केला आहे.**



चेन्नईविरुद्ध पंजाब किंग्जने ८३ धावांत पाच विकेट गमावल्या होत्या. पण प्रियांश आर्यने एका टोकाकडून आपली स्फोटक फलंदाजी सुरू ठेवली आणि ४२ चेंडूत सात चौकार आणि नऊ षटकारांसह १०३ धावा केल्या. ज्यामुळे पंजाबने २१९ धावांची मोठी धावसंख्या उभारली आणि चेन्नईचा १८ धावांनी पराभव केला. दरम्यान प्रियांशची फलंदाजी पाहून त्याचे दिल्लीचे प्रशिक्षक संजय भारद्वाज यांनी मोठं वक्तव्य केलं आहे.प्रियांशचे प्रशिक्षक संजय भारद्वाज म्हणाले, “तो शतकी खेळीनंतर काल रात्री सुमारे ३ वाजता झोपला आणि सकाळी ७.३० वाजता उठला आणि सर्वात आधी मला फोन केला. मग मी विचारलं की त्याला कालची खेळी पाहून कसं वाटलं. तो म्हणाला की, मी काहीचं केलेलं नाही, ती सर्व देवाची कृपा होती. देवच सर्वकाही करत आहे. प्रियांश असाच अगदी साधा आहे आणि नेहमीच तसाच राहतो.”त्याचे कोच भारद्वाज पुढे म्हणाले, प्रियांशने सांगितलं की, “श्रेयस अय्यर आणि रिकी पॉन्टिंग त्याला खूप पाठिंबा देत आहेत आणि त्यांनी मला माझ्या मनानुसार फलंदाजी करण्यास सांगितले आहे. त्या दोघांनी त्याला असंही सांगितलं की त्याला कोचिंगची गरज नाहीये.”शतक झळकावल्यानंतर प्रियांश आर्यने एक मोठा खुलासा केला आणि म्हणाला, “मी माझ्या भावना व्यक्त करू शकत नाही, पण आतून मला खूप चांगलं वाटतंय. गेल्या सामन्यानंतर श्रेयस अय्यरने मला स्वतःवर विश्वास ठेवण्यास सांगितले, त्याने मला माझ्या मनाप्रमाणे खेळण्याचा सल्ला दिला.”

प्रियांश आर्यच्या शतकाच्या जोरावर आणि शशांक सिंगच्या अर्धशतकाच्या जोरावर पंजाब किंग्सने ६ बाद २१९ धावा केल्या आहेत. यासह चेन्नई सुपर किंग्सला विजयासाठी २२० धावांचे लक्ष्य दिले होते.

### चेन्नईचा 18 धावांनी पराभव

चेन्नईविरुद्ध पंजाब किंग्जने ८३ धावांत पाच विकेट गमावल्या होत्या. पण प्रियांश आर्यने एका टोकाकडून आपली स्फोटक फलंदाजी सुरू ठेवली आणि ४२ चेंडूत सात चौकार आणि नऊ षटकारांसह १०३ धावा केल्या. ज्यामुळे पंजाबने २१९ धावांची मोठी धावसंख्या उभारली आणि चेन्नईचा १८ धावांनी पराभव केला.

स्मार्ट PCMC
SMART CITY
# महाईन्यूज
ePaper
। गुरुवार ।
। दि. 10 एप्रिल 2025।
epaper.mahaenews.com
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## ‘निर्भय कन्या’ अभियानामधून

# कल्पकतेमध्ये भविष्यातील संधी - लोटके

### शिक्षण विश्व: पिंपरी चिंचवड विद्यापीठात ‘आयडियाथॉन 2025’

। पिंपरी- चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**विद्यार्थिनींचा आणि समाजातील वंचित घटकांचा आत्मविश्वास वाढवण्यासाठी निर्भय कन्या अभियान मोठ्या प्रमाणात राबविण्यात आले पाहिजे. यामुळे महिलांचे मनोबल आणि आत्मविश्वास वाढेल. त्यातून त्यांचे व्यक्तिमत्व विकसित होऊन त्या सक्षम नागरिक म्हणून काम करतील, हाच निर्भय कन्या अभियानाचा मुख्य उद्देश आहे असे एसबीपीआयएमच्या संचालिका डॉ. किर्ती धारवाडकर यांनी सांगितले.**




आजचे युग हे विज्ञान, तंत्रज्ञानाचे आहे. शिक्षण घेत असताना विद्यार्थ्यांना अनेक कल्पना सुचतात, परंतु या कल्पना वास्तवात रूपांतरित होतातच असे नाही. मात्र आधुनिक तंत्रज्ञानाचा वाढता प्रभाव पाहता विद्यार्थ्यांनी कल्पनाशक्ती जोपासत त्यातून भविष्यातील संभाव्य संधीचा लाभ घेतला पाहिजे. पिंपरी चिंचवड विद्यापीठाने ‘आयडियाथॉन २०२५’ राष्ट्रीय स्पर्धा आयोजित करून त्याची उपयुक्तता सिद्ध केली आहे, असे मत औद्योगिक ऑटोमेशन आणि व्यवसाय वृध्दीतील तज्ज्ञ महेश लोटके यांनी व्यक्त केले.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट (पीसीईटी) संचालित पिंपरी चिंचवड विद्यापीठ (पीसीयु) साते मावळ येथे ‘आयडियाथॉन २०२५’ राष्ट्रीय स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. ‘कल्पनांचे वास्तवात रूपांतर करणे’ या विषयावर स्पर्धा घेण्यात आली. स्पर्धेसाठी देशभरातून एक हजार पेक्षा अधिक प्रवेशिका तर साडेतीनशे पेक्षा अधिक संघ सहभागी झाले. शंभरहून अधिक विद्यार्थ्यांनी आपले प्रकल्प सादर केले. यावेळी प्रभारी कुलगुरू डॉ. मणीमाला पुरी, प्र-कुलगुरू डॉ. सुदीप थेपडे, अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान विद्याशाखेचे प्रमुख डॉ. विजय पाटील आदी उपस्थित होते.

विद्यार्थ्यांनी सामाजिक समस्यांचा विचार करून सर्व सामान्य नागरिकांचे प्रश्न सोडविण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर मुक्तहस्ते केला पाहिजे, असे डॉ. मणीमाला पुरी म्हणाल्या.

दैनंदिन जीवनात नागरिकांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. हे आपण पाहतो. याचा विचार करून आधुनिक तंत्रज्ञानाचा सुलभ वापर करून जीवन अधिक समृद्ध कसे होईल याचा विचार केला पाहिजे; याकडे डॉ. सुदीप थेपडे यांनी विद्यार्थ्यांचे लक्ष वेधले. स्पर्धेचे परीक्षक म्हणून प्रा. डॉ. दीपा परासर अमिटी विद्यापीठ, मुंबई, रजत जाधव वरिष्ठ अभियंता, रोबोटिक्स ऑटोमेशन, ऑटोफिना रोबोटिक्स ऑटोमेशन प्रा. लि., तळेगाव, पुणे यांनी काम पाहिले.

#### स्पर्धेतील विजेते संघ

प्रथम क्रमांक - ड्रॅकोनिक्स- पिंपरी चिंचवड विद्यापीठ; द्वितीय - टीम कोडी - फा. कॉन्सेकाओ रॉड्रिग्ज कॉलेज ऑफ इंजिनियरिंग, मुंबई; तृतीय - टीम अल्निग्मा, केकेडब्ल्यू कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग, नाशिक.

स्पर्धेचे आयोजन डॉ. नीरू मलिक, डॉ. सागर पांडे, प्रा. अंकुश डहाट, आणि प्रा. तुषार माहोरे यांनी केले.

पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त तथा पीसीयुचे कुलपती हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी सहभागी विद्यार्थी आणि विजयी संघांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## त्रिवेणीनगरमधील चौकांमध्ये दोन्ही बाजूंना ‘हाईट बॅरीगेट्स’

### भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांच्या सूचनेची अंमलबजावणी

। पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**निगडीतील त्रिवेणीनगर, दुर्गानगर डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथील जड वाहतूक, वारंवार होणारी वाहतूक कोंडी, तसेच या भागातील शाळांची मोठी संख्या त्यामुळे विद्यार्थ्यांची सुरक्षा लक्षात घेऊन या महत्त्वाच्या चौकांमध्ये दोन्ही बाजूंना ‘हाईट बॅरीगेट्स’ बसविण्यात येणार आहेत.**



याबाबत महापालिका स्थापत्य विभाग, निगडी वाहतूक विभागाला भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांनी सूचना केली होती. त्यानुसार सदर कार्यवाही करण्यात आली. निगडी येथील प्रभाग क्रमांक १३ मध्ये असणाऱ्या दुर्गानगर चौकातून यमुनानगर मध्ये जाणाऱ्या रस्त्याला जड वाहनास बंदी आहे. तरी सुद्धा अनेकदा या रस्त्यावर भरधावपणे जड वाहने वाहतूक करतात. यापूर्वीच या भागातील जड वाहतूक बंद करण्यात यावी, अशी मागणी केली होती. वाहतूक विभागाने त्याप्रमाणे सकारात्मक प्रतिसाद देखील दिलेला होता मात्र या भागातून जडवाहनांना संपूर्णपणे अटकाव होऊ शकत नसल्याचे दिसून आले आहे. या भागामध्ये शाळांची संख्या सर्वाधिक आहे. नागरिक, पालकवर्ग, शाळेतील विद्यार्थी वर्ग, शाळेतील शिक्षिक वर्ग व कामगार वर्ग यांची रहदारी मोठ्या प्रमाणात असते. त्यामुळे अपघाताची शक्यता असते.अपघाताच्या काही घटना यापूर्वी देखील झालेल्या होत्या. अपघातावर नियंत्रण आणण्यासाठी या सर्व्हिस रस्त्यावरील जड वाहतुकीवर नियंत्रण आणण्यासाठी उंचीचे बॅरिगेट्सची गरज होती.

> “ वाढत्या महानगरांसमोर वाहतूक नियंत्रण, वाहतूक कोंडी या मोठ्या समस्या आणि आव्हान आहे. या समस्या सोडवण्यासाठी नागरिकांची मागणी, प्रभागाच्या लोकप्रतिनिधींची सूचना वेळोवेळी लक्षात घेतली जाते. त्याप्रमाणे निगडी लगतच्या त्रिवेणीनगर, दुर्गानगर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक या ठिकाणी उंचीचे बॅरियर बसविण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. यामुळे नागरिक, विद्यार्थी तसेच ज्येष्ठांना मोठा दिलासा मिळणार आहे.
>
> **–महेश लांडगे,**
> आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

# Moaraya Shikshan Sanstha Computer Vacation Batch 2024-25

ADMISSION OPEN

## Second Batch

From 5th April 2025
Duration One Month
1 Hour /day
Monday to Saturday

For
10th std Students,
12th std students,
parents,
others school students

'C' Language
Fees: 1300/-

Corel Draw
Fees: 1100/-

'C++' Language
Fees: 1300/-

Adobe Photoshop
Fees : 1100/-



Basic Java
Fees : 1300/-

Basic Tally
Fees : 1500

Scratch Animation
Fees : 1300/-

M.S. Office
Fees : 1500/-

Contact: 8087706100/ Computer Lab
Registration started
Venue: Computer Lab, V. K. Mate Highschool


Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE
ALANDI
2025-26
ADMISSIONS
OPEN
PRIYADARSHANI
SCHOOL, ALANDI
42 YEARS OF ENRICHING EXPERIENCE IN EDUCATION
50 FIFTY PLUS NATIONAL & INTERNATIONAL AWARDS ACROSS SCHOOLS
Contact Us Now
86687 55826
98232 31705
Wadgoan road, Sr.no. 98,
Opposite Ram Mandir,
Alandi 412105


Late Babanrao Gabaji Gawali Charitable Trust's
SPG INTERNATIONAL PUBLIC SCHOOL & JUNIOR COLLEGE
Powered by
JAI HIND EDUTECH
CBSE Affiliation No. : 1130741 • UDISE Code - 27252001012
BHOSARI CAMPUS : Sr. No. 203, Nr. Durwankur Lawns, Alandi Road, Bhosari, Pune-411039 (Maharashtra)
ADMISSION
OPEN
2025-2026
Pre Primary to Class XII
LIMITED SEATS
Hurry up!!!
Bi-focal / Technical / Vocational Subject are available
For Science Stream
Computer Science
Crop Science
Electronics
Mechanical / Technical Automobile
Information Technology (IT)
For Commerce Stream
Banking
Marketing & Sales
Office Management
Small Industries & Self employment
Information Technology (IT)
CALL NOW : 9763441639 / 8657473241


BLOSSOM YOUR KNOWLEDGE
PROUD PARENTS.
OUR BIGGEST
PRIDE.
ADMISSIONS OPEN FOR 2025-26
CBSE Curriculum, Aligned with NEP & NCF
Ambitious Projects like 'Read-to-Lead'
Legacy of 100% Results
Gayatri English Medium School & Jr. College
95277 64646 / 77967 67292
BRANCHES AT: CHARHOLI | MOSHI | DHANORE

KAMALA Education Society

KAMALA EDUCATION SOCIETY'S

# PRATIBHA INSTITUTE OF BUSINESS MANAGEMENT

**AICTE Permanent ID: 1-3675161 | DTE Code: 6167**

Approved by AICTE | B+ NAAC Accredited | Permanently Affiliated to Savitribai Phule Pune University

## ADMISSIONS OPEN

Full Time Undergraduate Courses (3 Years Degree Course, 4 Years Honours)



**BBA**

**Bachelor of Business Administration**



**BCA**

**Bachelor of Computer Applications**

### Highlights:

- Advanced Industrial and Research Learning
- Proven Track Record of Placements
- Mentoring and Seed Funds for Startups
- Skill Development and Certification Courses
- Live Industrial Projects
- Earn and Learn Scheme of Rs. 10,00,000+
- Govt. and Management Scholarships
- State of the Art infrastructure
- ICT enabled classrooms

Eligibility: Passed HSC Examination with any stream

**Call for more details:**

**BBA : Prof. Gururaj - 8624991767 | Dr. Pallavi - 9225635556**

**BCA : Prof. Manish - 9823223336 | Prof. Surabhi - 9049004895**

www.pibmpune.org.in

Scan QR code to know more


MASTER MIND GLOBAL
SCHOOL & Jr. College
(CBSE)
( Since 2013)
ADMISSIONS
OPEN FOR
NURSERY TO 12TH
Where There is
Creativity, There is
Master Mind
7
STAR
RANKING
Excellence in Education & Disciplined Environment
Co-Curricular & Extra Curricular Activities
Guaranteed Safety & Security
A++ Grade
In Leadership & Quality
Management
Contact : +91 7218125125
E-mail : mastermindglobalschool.com
Website : www.http://mastermindglobalschool.com